SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
Estd : 1962
NAAC `A` Grade
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१
संचालक, बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०

संदर्भ क्र./शिवाजी वि/संलग्नता/टी-२/ No 154 दि. 27 DEC 2017

## स्मरणपत्र

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**

**विषय - आपल्या महाविद्यालयाच्या प्रथम मान्यता पत्रांच्या (प्राथमिक संलग्नीकरण) प्रती सादर करणेबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या महाराष्ट्र शासन, विद्यापीठ व शिखर संस्थांच्या प्रथम मान्यता पत्रांच्या (प्राथमिक संलग्नीकरण) प्रती पाठविण्याबाबत आपणास संदर्भ क्र. संलग्नता/टी-२ /१४४ दि. ६ डिसेंबर, २०१७ रोजीच्या ई-मेल द्वारे कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरून काही महाविद्यालयांची माहिती प्राप्त झाली आहे. तथापि, ब-याच महाविद्यालयांची माहिती अद्यापि अप्राप्त आहे. Institute of Eminance च्या प्रस्तावासाठी युजीसीला सदरची माहिती पाठविणे आवश्यक आहे.

सबब, या ई-मेलद्वारे आपणास पुन:श्च कळविण्यात येते की, दि. ३०/१२/२०१७ अखेर आपल्या महाविद्यालयाकडून सदर माहिती affiliation.t२@unishivaji.ac.in या ई-मेल पत्त्यावर पाठविण्याबाबत दक्षता घेण्यात यावी. सदरची माहिती प्राप्त होईपर्यत आपल्याकडील या विभागाशी संबंधित इतर कोणताही पत्रव्यवहार स्थगित केला जाईल, तसेच आपल्या कोणत्याही मान्यतांबाबत कार्यवाही केली जाणार नाही याची गांभीर्याने दखल घेण्यात यावी.

त्याअनुषंगाने आपणास पुन:श्च आदेशान्वये सुचित करण्यात येते की, सदरची माहिती तात्काळ ई-मेलद्वारे व पोस्टाद्वारे या कार्यालयास पाठवावी.

**टिप - ज्या संस्था/महाविद्यालयांनी सदरची माहती या अगोदर पाठविली आहे, त्यांनी पुन:श्च सदरची माहिती पाठवू नये.**

आपला विश्वासू,

उपकुलसचिव
संलग्नता/टी-२ विभाग

d:\mangutkar\letter1 d).docx